<u>तक्रार युएलपी ६०/२०२४</u> <u>नि. यु—०५</u>

<u>अर्जदाराची सरतपासणी श्री व्ही.एम. शिकारे, प्रतिनिधी अर्जदारातर्फे:—</u>

०५. मी माझे पुराव्यात दाखल केलेले शपथपत्र तेच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व तो निशाणी यु—०५ वर आहे. आता मला नि.क्र. यु २ वरील दस्त क्र. ०४ खालील महाराष्ट्र मोटार कामगार संघ, चंद्रपुर यांचेमार्फत दि.०६/०२/२०२४ रोजीचे गैरअर्जदार यांना दिलेले पत्र दाखविले त्यास **<u>नि.क्र. यु ०६</u>** देण्यात आला. व तसेच दस्त क्र. ५ खालील तक्रारकर्ता यांना दि.०१/०६/२०२४ रोजीच्या मिळालेले मॅसेजची प्रत दाखवली त्यास **<u>नि.क्र. यु ०७</u>** देण्यात आला.

<u>उलटतपासणी श्री यु.व्ही. देशपांडे, अधिवक्ता, गैरअर्जदारा तर्फे :</u>

०६. माझे शिक्षण एम.कॉम. पर्यंत झाले आहे. सेवानिवृत्तीनंतर मला भविष्यनिर्वाह निधी व उपदान मिळालेली आहे. मी सेवानिवृतत झाल्यानंतर रजारोखीकरणाची रक्कम मिळण्याकरीता सन २०१६ मध्ये अर्ज केला होता. मी महाराष्ट्र मोटार कामगार संघटना, चंद्रपुर विभाग यांचा सदस्य आहे सदरील कामगार संघटनेस मान्यता आहे. मी सदरील संघाचा सदस्य असल्याबाबत व सदरील संघ मान्यताप्राप्त असल्याबाबत दस्ताऐवज लेखावर दाखल केले नाही. सन २०१६ नंतर रजारोखीकरणाची रक्कम मागण्याकरीता मी दोन ते तीन वेळेस गैरअर्जदार यांचेकडे गेलो होतो. गैरअर्जदार हे पैसे देतो असे म्हणाल्यामुळे मी तक्रार उशिराने दाखल केली. हे मला माहित नाही की, एखादा कामगाराविरूध्द अन्याय झाला असल्यास तक्रार दाखल करण्याकरीता फकत ९० दिवसांचा कालावधी उपलब्ध असतो. हे म्हणने खरे नाही की, अधिकची रक्कम मिळणेकरीता मी खोटी केस दाखल केली आहे. मी तक्रार वाचुन त्यावर सही केली आहे. तक्रार करण्यास घडलेले कारण मी तक्रारीत नमुद केले नाही. मला महामंडळाकडून कोणतीही रक्कम घेणे शिल्लक

<u>तक्रार युएलपी ६०/२०२४</u> <u>नि. यु—०५</u>

नाही साक्षीदार सांगतो की, मी व्याज मिळण्यास पात्र आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तरी स्वीकृत

स्वा/—
(आर. टी. साखरे)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, चंद्रपुर

दिनांक : १६/०४/२०२५